कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

विद्यार्थ्याचे नाव - घाडगे शुभम सुरेश

रोल नं :- 424

मोबाईल नं :- 8600819866

विषय - आधुनिक व्यवस्थापन सराव

- संचालक मंडळाची भूमिका

सेमिस्टर - V

मार्गदर्शक शिक्षीका - शेटे एस. एस mam

सन = 2017-18

Scanned with CamScanner

# कंपनीसाठी शासन व्यवस्था

**व्याख्या :-**

**जॉन गॅरॉत :**

कंपनीसाठी शासन व्यवस्था म्हणजे कंपनीचे भागधारक व हितसंबंधी धारक यांच्या वाढत्या बदलत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संचालक मंडळाची संरचना प्रक्रिया व मूल्यमापनपद्धती हाताळणारी व्यवस्था होय.

* **संचालक मंडळाची भूमिका :-**

① **जबाबदारी बाबत योग्य भान :-**

संचालक मंडळाने कंपनीचे व्यवस्थापन करताना व महत्वाचे धोरणात्मक निर्णय घेताना आपल्या जबाबदारीचे योग्य भान ठेवणे आवश्यक आहे. विभिन्न धारकांच्या हितसंबंधामध्ये संघर्ष न होऊ देता. त्या हितसंबंधामध्ये योग्य समन्वय साधला पाहीजे. वैयक्तीक हीतसंबंध जाणीवपूर्वक टाळले पाहीजे.

② **विश्वस्ताची भूमिका :-**

कंपनीच्या कारभाराबाबत आपली कर्तव्ये व कार्ये पार पाडताना आपण कंपनीचे विश्वस्त असल्याची जाणीव संचालकाने सातत्याने ठेवावी. भाग धारकांनी कंपनीचा कारभार पाहण्यासाठी निवडून दिले आहे व त्यांच्या विश्वास अबाधीत राखला पाहीजे.

Scanned with CamScanner

③ **भागधारकांच्या सूचनांचा आदर :**

अनेकदा कंपनीचे भागधारक कंपनीच्या कारभाराबाबत सूचना करतात. अशा सुचना आल्यास त्याच्या संचालक मंडळाने गांभीर्याने विचार केला पाहीजे. संचालक मंडळाच्या बैठकीपुढे अशा सुचनांवर चर्चा करुन त्याबाबत योग्य निर्णय होतला पाहीजे व त्याचा तपशील सर्व भाग-धारकांना कळविणे आवश्यक आहे.

④ **स्वतंत्र संचालकांची नियुक्ती :**

संचालक मंडळामध्ये कार्यकारी संचालक व बिनकार्यकारी संचालक असे दोन प्रकार पडतात. कार्यकारी संचालकांना स्वतंत्र संचालक म्हणुन संबोधले जाते. ते पूर्णवेळ संचालक असतात. अशा संचालकाकडे विशीष्ट विभागाची जबाबदारी सोपविण्यात येते. तेव्हा कंपनीच्या कारभाराच्या दृष्टीने स्वतंत्र संचालकाची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

⑤ **स्वतंत्र संचालकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

प्रत्येक स्वतंत्र संचालकाची कर्तव्ये, कार्ये, जबाबदाऱ्या व कार्यक्षम स्पष्टपणे ठरविणे महत्वाचे असते. संचालक मंडळाने याबाबत काटेकोर स्पष्टता ठेवावी लागते. याच आधारे संचालक मंडळाला स्वतंत्र संचालकांच्या जबाबदाऱ्या ठरवुन देण्याची भूमिका पार पाडावी लागते.

Scanned with CamScanner

⑥ हिशोब तपासणी समितीची नियुक्ती :

कंपनीच्या हिशोबाच्या व व्यवहाराचे योग्य प्रकारे विश्लेषण करण्यासाठी संचालक मंडळाची हिशोब तपासणी समिती नियुक्ती करणे. कंपनी कायद्यानुसार बंधनकारक आहे. त्यानुसार संचालक मंडळाने सदर समितीवरील सदस्यांच्या नियुक्ती बाबत संचालक मंडळाने योग्य भूमिका होणे आवश्यक आहे.

⑦ ई- उपस्थितीची सुविधा :

संचालक मंडळाच्या बैठकांना प्रत्येक वेळी काही कारणांमुळे उपस्थित राहणे शक्य नसते. त्यामुळे महत्वाच्या विषयांबाबत गैरहजर संचालकांना चर्चा करण्याची संधी देण्यात यावी अशा प्रकारे ई-उपस्थि-तीची सुविधा पुरवण्याची जबाबदारी संचालक मंडळाला पार पाडावी लागते.

अशा प्रकारे संचालक मंडळाची भूमिका सांगता येते.

Scanned with CamScanner